# लातूर शहर महानगरपालिका, लातूर
# कर संकलन विभाग

## ▪ लातूर शहर महानगरपालिका ,लातूर

- लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताची कर आकरणी सन २०१७-१८ मध्ये करण्यात आली होती. मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम १९४९ चे कराधान प्रकरण ८ कलम २१ (२) नुसार दर पाच वर्षातून निदान एकदा नवीन कर आकारणी पुस्तक तयार करण्यात आले पाहिजे अशी तरतूद आहे. त्यानुसार सदर कर आकारणी ही २०२२-२३ मध्ये करणे आपेक्षीत आहे.
- लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताकराचे सर्वेक्षण हे जी. आय. एस बेस व भांडवली मुंल्यावर आधारित करण्यासाठी मा. आयुक्त तथा संचालक नगर परिषद संचालनालय यांचे शासन निर्णय क्रंमाक नपप्रसं-२२०/सर्वनप/ मा. करभां, मुल्य/ प्र. क्रं., ६५/ कक्ष १० (६) दिं. ०९ ऑक्टोबर २०२० अन्वये शहरातील मालमत्ताचे सर्वेक्षण करण्याकरिता ई निविदा प्रक्रिया राबवण्या येत आहे.
- सदरची ई निविदा ही दिं. १३/०९/२०२२ रोजी ई. महाटेंड्रर या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे
- त्यानुसार निविदा उघडण्याची अंतिम दिं ६/०९/२०२२ आहे
- उक्त प्रक्रिया पूर्ण होताच सदरचे काम हाती घेण्यात येणार आहे

- **एपीएमसी व एमआयडीसी बाबतचा अहवाल**

- लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील एपीएमसी व एमआयडीसी भागातील मालमत्ता या करआकरणीच्या दाय-यातून घेण्यात आल्या असून सन २०२२-२३ या अर्थिक वर्षामध्ये सर्व मालमत्ताधारकास मागणी बीले वाटप करण्याचे काम प्रगती पतावर असून बीले वाटप होताच सदर भागातील मालमत्ताधारकाकडून मालमत्ताकराची व इतर कराची वसूली करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतूदीनुसार सक्तीची मोहिम हाती घेण्यात येणार आहे

- मालमत्ताधारकास बील वाटपा बाबत
- मालमत्ताकराच्या वसुलीचे प्रमाण वाढवण्यासाठी क्षेत्राय कार्यालय ए, बी, सी, व डी या क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील मालमत्ताधारकास मालमत्ताकरचे बील वाटप करण् यासाठी मागणी बीले क्षेत्रीय कार्यालयाकडे या पूर्वीच हास्तातंरीत करण् यात आले असून बील वाटपाचे काम प्रगतीपतावर असून मागणी बीले वाटप होताच सर्व क्षेत्रीय अधिकारी यांच्या मार्फत वसुलीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९मधील तरतूदीनुसार कार्यवाही हाती घेवुन वसूलीचे उदिष्ट पूर्ण करण् यासाठी प्रयत्न केले जातील.